महाराष्ट्र शासन
इतर मागासवर्ग व बहुजन कल्याण विभाग, महाराष्ट्र राज्य, मुंबई.

महाज्योती

कार्यालय, व्यवस्थापकीय संचालक, महात्मा ज्योतिबा फुले संशोधन व प्रशिक्षण संस्था
(महाज्योती), महाराष्ट्र राज्य, नागपूर

पत्ता : डॉ.बाबासाहेब आंबेडकर सामाजिक न्याय भवन, ३ रा माळा, दीक्षाभूमी रोड, श्रद्धानंद पेठ, नागपूर - ४४० ०२२
दूरध्वनी क्र.०७१२- २९५९३८१ CIN No. U८५३००PN२०१९NPL१८७४०५ ई-मेल: fellowshipmahajyoti@gmail.com

जावक क्र.महाज्योती/PHD/२०२५/ 417 दि.१०.०२.२०२५

परिपत्रक

विषय : पीएच.डी.अधिछात्रवृत्ती योजना-२०२३ मधील विद्यार्थ्यांना नोंदणी दिनांकापासून रक्कम अदा करण्याबाबत.

पीएच.डी.अधिछात्रवृत्ती योजना-२०२३ मधील विद्यार्थ्यांना नोंदणी दिनांकापासून रक्कम अदा करण्याबाबत अनेक पत्र तसेच महाज्योतीच्या Call Center वर संशोधक विद्यार्थी विचारणा करीत आहेत. विद्यार्थ्यांमधील संभ्रमावस्था दूर करण्याच्या हेतूने उपरोक्त विषयास अनुसरून सर्व संबंधितांना सूचित करण्यात येते की, सामाजिक न्याय व विशेष सहाय्य विभाग, शासन निर्णय क्र.सान्यावि-२०२४/प्र.क्र.७७/बांधकामे दि.२५ जुलै २०२४ अन्वये शासनाने पात्र विद्यार्थ्यांना ५०% दराने अधिछात्रवृत्ती देण्यास मान्यता प्रदान केलेली होती. तदनंतर इतर मागास बहुजन कल्याण विभाग, शासन निर्णय क्रमांक महाज्यो-२०२४/प्र.क्र.४८/संस्था दि.११.१०.२०२४ अन्वये पीएच.डी. अधिछात्रवृत्ती-२०२३ मधील पात्र संशोधक विद्यार्थ्यांना नोंदणी दिनांकापासून १०० टक्के दराने सरसकट अधिछात्रवृत्ती मंजुर करण्यास सुधारित मान्यता देण्यात आलेली आहे. या करिता अंदाजित एकूण १२६.१४ कोटी निधी लागणार आहे, सदर बाब ही नव्याने उद्भवलेली असल्याने व मंजूर कृती आराखड्याच्या बाहेरील असल्याने सदर निधीची मागणी ही महाज्योती कार्यालयाने पूरक मागणीद्वारे शासनाकडे केलेली आहे.

सदर निधी उपलब्ध झाल्यानंतर याबाबत नियमानुसार पुढील कार्यवाही करण्यात येईल. तसेच योजनेकरिता शासनाने पात्र ठरवलेल्या उपरोक्त शासन निर्णयाच्या दिनांकापासून म्हणजेच दि.२५ जुलै २०२४ ते दि.३१ डिसेंबर २०२४ या कालावधीतील रक्कम अदा करण्याबाबत नियमानुसार कार्यवाही करण्यात येत आहे. या अनुषंगाने संशोधन प्रगती अहवाल मागविण्यात आलेले असून प्राप्त होताच तपासून अधिछात्रवृत्तीची रक्कम अदा करण्याची कार्यवाही करण्यात येत आहे.

(धम्म गजभिये)
प्रकल्प अधिकारी (पीएचडी अधिछात्रवृत्ती विभाग),
महात्मा ज्योतिबा फुले संशोधन
व प्रशिक्षण संस्था (महाज्योती), नागपूर